साप्ताहिक ग्लो नांदेड 16/03/2022

# ९ मार्च रोजी हल्ला करणारा मारेकरी ४८ तासांत इतवारा पोलिसांनी ताब्यात घेतला

साप्ताहिक ग्लो नांदेड 16/03/2022

नांदेड - ९ मार्च रोजी देगलूर नाका परिसरात फळ विक्रेता अब्दुल युसूफ कादर यास जखमी करून एक व्यक्ती पळून गेला होता. ९ मार्चच्या रात्री अब्दूल युसूफ कादरचा मृत्यू झाला. इतवारा पोलीस ठाणे गुन्हा शोध पथकाने आज त्या मारेकऱ्याला शोधले आहे. सध्या तो पोलिसांच्या ताब्यात आहे.



९ मार्च रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास अब्दुल युसूफ कादर हा फळ विक्रेता युवक (२०) आपली फळांची गाडी घेऊन जात असताना पाठीमागून त्याच्या पाठीत खंजीर खुपसून एक व्यक्ती पळून गेला. तसा तो त्याच्या ओळखीचा होता, पण त्याचे नाव त्याला माहित नव्हते. या प्रकरणी सुरूवातीला गुन्हा भारतीय दंड संहितेच्या ३२६ नुसार दाखल झाला. त्याचा क्रमांक ४४/२०२२ असा आहे. ९ मार्चच्या रात्री जखमी अवस्थेतील अब्दुल युसूफ कादरचा मृत्यू झाला. त्यानंतर या गुन्ह्यात भारतीयदंड संहितेचे कलम ३०२ वाढले. पोलिसांनी हल्लेखोर पळून गेलेल्या रस्त्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले तेव्हा त्यांनी एका व्यक्तीला त्यातून वेगळे केले आणि तोच मारेकरी आहे, या प्रमाणे त्याचा शोध सुरू झाला. इतवारा पोलिसांनी जनतेला सुद्धा आरोपी शोधण्यासाठी मदत करावी असे

पान ४ वर ➤➤